# प्रेसनोट

दिनांक:- १०/०८/२०१९

**वाहतुक शाखेतर्फे ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविदयालय (ए.आय.एस.एस.एम.एस.) पुणे येथील महाविदयालयीन विदयार्थ्यांसाठी 'रस्ता सुरक्षा अभियान' कार्यक्रम क्रमांक ३ चे आयोजन**

पुणे शहराची वाढती लोकसंख्या व त्या पटीने वाढत असलेली वाहनाची संख्या यामुळे पुणे शहरात व आसपास गजबजलेल्या ठिकाणी वाहन अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याला एक महत्त्वाचे कारण म्हणजे वाहन चालकांचा बेशिस्त व बेदरकारपणा तसेच रस्ते सुरक्षेबाबत अनभिज्ञता असने हे होय. पुणे शहरातील व आसपासची वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे बरोबरच वाहन चालकांना मुख्यत्वेकरुन महाविदयालयीन विदयार्थी यांना रस्ता सुरक्षा संदर्भात तसेच स्वयंम: सुरक्षेसंदर्भात विविध तज्ञ व्यक्ती मार्फत समुपदेशन करुन त्यांना शिस्त लावणे व वाहन अपघाताचे प्रमाण कमी करण्याचा अभिनव उपक्रम पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त यांनी सुरु केला आहे. या उपक्रमाचाच एक भाग म्हणून वाहतुक शाखा पुणे शहर व ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविदयालय (ए. आय. एस. एस. एम. एस.) पुणे यांचे संयुक्त विदयमाने दिनांक १०/०८/२०१९ रोजी ११.०० ते १३.०० वा. चे दरम्यान महाविदयालयीन विदयार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा संदर्भात **"रस्ता सुरक्षा अभियान"** कार्यक्रम क्र.०३ संदर्भात १८२ वे सत्राचे ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविदयालय (ए. आय. एस. एस. एम. एस.) पुणे महाविदयालयातील सेमिनर हॉल येथे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास श्रीमती डिक्रुझ, श्रीमती सुविधा पाटील, प्राध्यापक, ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविदयालय (ए. आय. एस. एस. एम. एस.) पुणे तसेच श्री राजेश पुराणिक, पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात श्री राजेश पुराणिक पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा पुणे शहर यांनी आपले प्रस्तावनापर भाषणात सांगीतले कि, सद्या रस्ता आणि वाहन हा तरुणाईच्या जिवनाचा अविभाज्य घटक झाला आहे. तरुणाईने वाहन अतिशय जबाबदारीने वं शिस्तबध्द पध्दतीने वापरणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असा अर्थ न घेता तरुण पिढीने जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. आपल्याला ७० वर्षे स्वातंत्र्य मिळुन ही आपण नियमांचे पालन करीत नसल्याने किंवा अनुशाषीत नसल्याने वाहतुकीचे प्रश्न गंभीर होत चालले असल्याची जाणीव करुन दिली. आपल्या देशा नंतर ०१ वर्षाने स्वातंत्र्य मिळालेल्या इस्त्राईल या देशाने अनुशासन व तेथील नागरिकांची देशभक्ती यामुळे ते बिकट परिस्थितीवर मात करुन प्रगती पथावर आहेत. आपल्या देशातील नागरिकांमध्ये अनुशासन व देशभक्ती कमी होत चालल्याचे दिसुन येत आहे. वाहतुक नियमांचे पालन करुन देशात दर वर्षी अपघातामध्ये मरण पावणारे १,४७,००० (एक लाख सत्तेचाळीस हजार) ही संख्या नक्की कमी करता येईल असे सांगीतले. तसेच सदरवेळी मा. सर्वोच्च न्यायालयाने सन २०१६ मध्ये पारीत केलेल्या "गुड सॅमरिटन" कायद्याबाबत माहिती देवून कायद्यातील तरतुदी प्रमाणे अपघातग्रस्तांना मदत करतांना सद्भावपुर्वक केलेल्या कृत्यांना कायद्याचे संरक्षण असल्याची माहिती करुन दिली. तसेच वाहतूकी संदर्भातील कायदे व त्यातील तरतुदी बाबतचे मार्गदर्शन केले.

तसेच सीसीटीव्ही कॅमे-यांद्धारे करण्यात येणारी कारवाई, डी जी लॉकर व सतर्क पुणेकर या ॲपलीकेशन बाबत प्रोजेक्टरवर चित्रफित दाखवुन इतंभुत माहिती सांगुन त्यांचा दैनंदीन जिवनात काय उपयोग आहे याबद्दल मार्गदर्शन केले. पुणे करांची हेल्मेटबाबत मानसिकता कशी आहे, याबाबत वाहनचालकांचे समुपदेशन करताना संवाद साधला त्यावेळी त्यांनी सांगितले की, रस्ता सुरक्षेच्या नियमांचे पालन न केल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. त्यातही मनुष्याच्या मेंदू व्यतिरिक्त अन्य भाग ऑपरेशनव्दारे बदलता येवू शकतात परंतू मेंदू बदलता येत नसल्याने सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरीकांनी आपल्या सुरक्षेची जबाबदारी काही प्रमाणात स्वत: घेणे अपेक्षीत आहे. मनुष्याचे जीवन हे अमुल्य आहे, त्यांतही मेंदू सारखे नाजूक अवयवास इजा झाल्यास त्यात अद्याप तरी सुधारणा करता येत नाही. त्यामुळे दुचाकी चालवताना हेल्मेट परिधान करणे व मोटर कार चालवताना सिट बेल्ट लावणेची शिस्त अंगी बाळगणे बाबत माहिती दिली.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती सुविधा पाटील , प्रोफेसर ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविदयालय (ए. आय. एस. एस. एम. एस.) पुणे यांनी केले व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

सदर **"रस्ता सुरक्षा अभियान"** कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व विदयार्थ्यांना **"रस्ता सुरक्षा मार्गदर्शिका"** पुस्तकाचे वाटप करण्यात आले. सदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात आला आहे. सदर कार्यक्रमासाठी सुमारे ११० विदयार्थी उपस्थित होते. त्यांना वाहतुकी संदर्भातील कायदे व त्यातील तरतुदी याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले आहे.

तसेच ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे अभियांत्रिकी महाविदयालय (ए.आय.एस.एस.एम.एस.) पुणे व वाहतुक शाखा पुणे शहर यांचे संयुक्त विदयमाने सदर महाविदयालयातील विदयार्थ्यांसाठी पुढील प्रकल्प राबविण्यात येणार आहेत
१.पोलीस मित्रमंडळ स्थापन करणे २. विदयापीठ स्तरावर पथनाटय, चित्रकला, ॲलोकेशन कॉम्प्युटेशन, ३. चौक किंवा रस्त्याचे पालकत्व, ४. कॉलेज स्तरावर वाहतुक कमिटी स्थापन करणे. ५. प्रसारमाध्यमे, जिवंत देखावे सादर करणे ६. भिंतीवर वाहतुक चिन्हांचे बोर्ड, झेब्रा क्रॉसिंग व पार्किंग तयार करणे ७. गुड सॅमिरिटन कायदया बाबत जनजागृती, फ्लेक्स तयार करणे व विदयार्थ्यांना गुड सॅमिरिटन पारितोषिक प्रदान करणे.

(राजेश पुराणिक)
पोलीस निरीक्षक
वाहतूक शाखा, पुणे शहर